Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-VIII Aug. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# शासनाच्या एड्स निर्मुलन विषयक योजना व कार्यक्रम

धनजंय पाटील
लातूर

**प्रस्तावना:**

जी.डी.एच. कोल यांच्या मते, "जिथे प्रत्येक नागरिकाला किमान राहणीमानाची खात्री आणि संधी प्राप्त होते असा समाज म्हणजे कल्याणकारी शासन व्यवस्था होय." राज्यात वावरत असताना व्यक्तिगत क्षमतेचा विकास घडवून आणण्याचे स्वातंत्र्य लोकांना असते, व्यक्तीच्या गुणांचा विकास होतो, भूक, बेघरपणा किंवा वंश, पंथ व वर्ण या कारणांवरुन होणाऱ्या जुलुमांपासून मुक्तता असते व त्यामुळे जीवन सुखी-आंनदी बनविण्याची व्यक्तीला संधी प्राप्त होत असते असे राज्य म्हणजे कल्याणकारी शासन होय.यानुसार राज्यातील सर्वच नागरिकांना आपला उदरनिर्वाह करण्यासाठी शासन कल्याणकारी कार्ये करित असते.यामध्ये समाजातील दुर्बल, अपंग, असहाय्य लोकांना विशेष योजना व कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांना विकासाच्या प्रवहात आणण्याचे कार्य शासन करित असते. त्यामुळे आजाराने ग्रस्त असलेल्या नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यांना चांगले आरोग्य प्रदान करण्याची जबाबदारी शासनाची असते.यातूनच १९९०च्या दशकात भारतात एका भंयकर अशा सामाजिक आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यांना तोंड देण्यासाठी शासन कटीबध्द होते. ही भंयकर समस्या म्हणजे एड्स किंवा एच.आय.व्ही. ची लागण होय. या भंयकर समस्येला दूर करण्यासाठी शासन विविध प्रयत्न करत होते. यातील महत्त्वाची घटना म्हणजे १९९२ ला राष्ट्रीय एड्स नियंत्रण विभागाची स्थापना आरोग्य मंत्रालयाअतर्गत करण्यात आली व ही आरोग्याची समस्या सोडविण्यासाठी शासन व स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून एड्स निर्मलून करण्यासाठी प्रयत्न करण्यात आला

एड्स नियंत्रणाबाबत केंद्र, राज्य व स्थानिक शासन व्यवस्थेकडून एड्सधारकांना मानसिक, आरोग्यविषयक सेवा सुविधा चांगला रितीने पोहंचविण्यासाठी, लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी विविध योजना व कार्यक्रम राबविले जातात त्यातील काही महत्त्वपुर्ण योजना व कार्यक्रम पुढील प्रमाणे.

**राष्ट्रीय एड्स नियत्रंण विभागाद्वारे एड्स नियत्रंण विषयक कार्ये -**

- एड्स नियत्रंण व नायनाट याच्यासंबंधीत केंद्र व राज्य स्तरावरील संगटनामध्ये तसेच शासन व नागरिक यांच्यात समन्वय निर्माण करण्याचे कार्य करते. यामध्ये विविध योजना निर्मिती व त्याच्या कार्यान्वयामध्ये समन्वय निर्माण करण्याचे कार्य या विभागाद्वारे केली.
- एड्स नियत्रंण व नायनाट, उपचार आणि त्याबाबत व्यवस्थापन करण्यासाठी व योग्य समन्वय निर्माण करण्यासाठी विविध चांगली संरचनात्मक संगटना किंवा संस्थांची निर्मिती करणे.
- एच.आय.व्ही. संबंधीत संदेश, सुचना व कार्यक्रमाचा योग्य व वेळेत परिपुर्णपणे अंमलबजावणी करणे. या कार्याचा अचूक असा लेखाजोखा ठेवणे. तसेच आजार पसरविणाऱ्या घटकांना योग्य नियत्रिंत ठेवणे. त्यासाठी योग्य त्या प्रभावी उपाययोजना आखणे.
- एच.आय.व्ही. किंवा एड्स आजाराची भयंकरता लक्षात घेता या आजारात पुर्व काळजीच हा ऐकमेव प्रभावी मार्ग असल्यामुळे नागरिकांमध्ये याबाबत जागरुकता निर्माण करणे, त्यांना योग्य ती काळजी घेण्यासाठी प्रेरीत करणे व नागरिकांना सशक्त बनविणे.

- एच.आय.व्ही. नियत्रंण करण्यासाठी एड्स नियत्रंण व्यवस्थापन करणे, त्यावर संशोधन करणे, तसेच विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना विविध योजना व कार्यक्रमाविषयी प्रशिक्षण देणे.
- देशातील एच.आय.व्ही. निर्मुलन करण्यासाठी आतंरराष्ट्रीय मदत मिळणे, विविध कार्याविषयी परराष्ट्राबरोबर देवाण-घेवाण करणे. यामध्ये औषधोपचार, तंत्रज्ञान, उपचार व आर्थिक यांची देवाण-घेवाण करणे.
- एड्स नियत्रंण करण्यासाठी सर्वच क्षेत्रात संशोधन करण्यासाठी देशातील विविध संस्था, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे.

अशी विविध कार्ये राष्ट्रीय एड्स नियत्रंण विभागास करावी लागतात.याचबरोबर नियंत्रण ठेवणे, कर्मचारी व्यवस्थापन करणे, जनतक्रार निवारण करणे इत्यादी कार्येही या विभागाद्वारे केली जातात.

**१) रक्त सुरक्षा :**

एच.आय.व्ही. किंवा एड्स हा आजार रक्ताच्या माध्यमातून प्रामुख्याने पसरत असल्यामुळे रक्तातील एच.आय.व्ही. या विषाणू मुळे होत असल्यामुळे प्रथमत: देशातील सर्वच ठिकाणच्या रक्त सुरक्षेची काळजी घेण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये रक्त पेढीत रक्त संकलन करताना त्याची एच.आय.व्ही. टेस्ट करण्यात येते. तसेच ते दुषित होणार नाही यासाठी आधुनिक तत्रंज्ञानाचा उपयोग करण्यात येत आहे. यामुळे एच.आय.व्ही. ची लागण होण्यावर नियत्रंण येत आहे. या योजनेत देशातील विविध संस्थांपैकी ८३ टक्के संस्थांच्या माध्यमातून २०१२-१३ या वर्षात ६७.५६ लाख युनिट रक्तांचा सग्रंह सुरक्षित करण्यात आला होता. *

**२) आरंभिक शिशु निदान:**

पुर्वी नवजात बालकाचे एच.आय.व्ही. टेस्ट करण्यासाठी त्याच्या १८ महिन्या (दिड वर्षापर्यंत) थांबावे लागत होते. ज्याचा परिणाम त्यावरील उपचार करण्यास विलंब होत असत त्यामुळे २०१० पासून आरंभिक शिशु निदान योजनेत देशातील अनेक शिशुचे निदान करण्यात आले होते. यामध्ये देशातील ११५७ ICTCs व २३७ इतर संस्थांच्या माध्यमातून १२.१६९ बालकांचे निदान करण्यात आले.

**३) एच.आय.व्ही. सल्ला व तपासणी सेवा केंद्र:**

भारतात यौन साक्षरता नसल्यामुळे एच.आय.व्ही.ची लागण मोठया प्रमाणात झाल्याचे दिसून येते.त्यामुळे नागरिकांना एच.आय.व्ही. आजारबाबात सल्ला देणे, त्यांना जागरुक करणे तसेच त्यांची मोफत तपासणी करण्यासाठी या केंद्राची स्थापना देशभरात करण्यात आली आहे. यामध्ये युवा-युवक, माता-पिताकडून बालकास होऊनये यासाठी योग्य सल्ला व तपासणी करण्याचे कार्ये केले जाते. आज भारतात ४५०८ व १०,००० जवळ सल्ला केंद्र निर्माण करण्यात आले आहेत.

**४) लिंक कार्यकर्ता योजना:**

लिंक कार्यकर्ता योजनेच्या माध्यमातून समूह आधारित कार्यामध्ये एच.आय.व्ही. संबंधीत निर्देश, सुचना, कंडोम उपयोगास प्रोत्साहन, वितरण तसेच सल्ला, तपासणी आणि एसटीआई सेवासाठी रेफरल की सुविधा प्रदान करण्यासाठी २०१२ मध्ये १३९ जिल्हयात ग्रामीण भागात ही योजना सुरु केली.

**५) कंडोम संवर्धन योजना:**

राष्ट्रीय एड्स नियंत्रण विभागाच्या वतीने पहिल्या टप्यामध्ये १३ राज्यामध्ये कंडोम सामाजिक वितरण कार्यक्रम राबविला.जो चार टप्प्यामध्ये करण्यात येणार आहे.यामध्ये नागरिकांना मोफत कंडोम वितरणाचे कार्ये करण्यात येते. २०१२ पर्यंत यामध्ये २२.८३ करोड कंडोमचे वितरण करण्यात आले होते.यामध्ये ग्रामीण भागामध्ये याचा उपयोग करण्यात यावा यासाठी मिडीयाच्या माध्यमातून जागरुकता त्याचा उपयोगाचे महत्त्व सांगण्याचे कार्य केले जात असे.

**६) आधुनिक प्रयोगशाळा निर्माण कार्यक्रम:**

या कार्यक्रमा अतर्गंत देशातील विविध भागात सेंटर फॉर डायजेस ची निर्मिती करण्यात आली. सन २०१३ मध्ये अशा २६४ सेंटर मध्ये नवीन अत्याधुनिक तत्रंज्ञानाने विकसित अशा प्रयोगशाळा निर्माण करण्यात आल्या. यामध्ये बाह्य मुल्यांकनाबरोबर किट मुल्यांकन व गुणवत्तेवर विशेष भर देण्यात आला आहे. या संदर्भात देशातील सर्व आरोग्य अधिकाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देण्यात आले.

**७) मुख्य प्रवहात समाविष्ट करणे योजना:**

एच.आय.व्ही. पिडीत नागरिकांना सामाजिक मान सन्मान प्राप्त होण्यासाठी, त्यांना आरोग्याच्या सुविधा मिळण्यासाठी भारतात एच.आय.व्ही. यांना मुख्य प्रवहात समाविष्ट करुन घेण्याची योजना निर्माण करण्यात आली. यामध्ये २०१२ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण मिशन, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम आदीच्या संयुक्तरित्या देशातील एच.आय.व्ही. ग्रस्तांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करुन देणे, सर्व विभागात समन्वय निर्माण करुन एच.आय.व्ही. ग्रस्तांची देखभाल करणे, त्यांना सहाय्यता करणे त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणे यासाठी ही योजना सुरु केली व यात ३.१ लाख एच.आय.व्ही. ग्रस्तांना याचा आधार मिळाला आहे.

**८) जनसंचार अभियान:**

एच.आय.व्ही. पिडीत नागरिकांना सामाजिक आधार देणे, त्यांना जगण्याची उमेद निर्माण करणे, त्यांच्या विषयाच्या गैरसमजूती दूर करणे, त्याच्यांतील न्युगंड दूर करणे. सर्वसामान्य नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करणे अशा विविध कार्यासाठी देशातील विविध मिडीयाच्या मदतीने विविध अभियान राबविणे. यामध्ये दरवर्षी रेडीओ व दुरदर्शनच्या माध्यमातून वर्षातून ५ तरी अभियान राबविले जातात.

**९) रेड रिबन क्लब:**

देशातील एच.आय.व्ही. पिडीतांच्या समस्या, त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांच्या औषधोपचार, विविध तपासणी व आजारावर नियत्रंण ठेवण्यासाठी सेवाभावी संस्था, शैक्षणिक संस्था जसे महाविद्यालय याच्या आधारे एच.आय.व्ही. ग्रस्तांना मदत करण्यासाठी रेड रिबन क्लबची स्थापना करण्यात आली. या क्लबच्या माध्यमातून एच.आय.व्ही. ग्रस्ताना सर्व प्रकारची मदत करण्यात येते. देशभरात अनेक शहर व ग्रामीण भागात रेड रिबन क्लबची स्थापना करण्यात आली आहेत. सध्या देशभरात १० हजाराच्या वरती रेड रिबन क्लब ची स्थापना करण्यात आलेली आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. Social Administration in India- G.B.Sharma/V.N. Kulkarni,New Dehli Research pub.२९१६५Acc., १९९८
२. Social welfare Administration Organization & Working Vol-I, II.S.L. Goel, R.K. Jain New Dehli Deep & Deep publication, १९८८
३. सामाजिक विकासाचे प्रश्न आणि धोरण -- शरदचंद्र गोखले, विहनस प्रकाशन, पुणे, १९८९